सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महिला व बाल विकास विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकरिता २२३५-२०७२, ०१-वेतन या बार्बीवर निधी वितरणाबाबत..........

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : मबाआ-२०१७/प्र.क्र.८०/का.०७
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८

वाचा : १) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८८/अर्थ-१, दिनांक २७/०१/२०१७
२) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.अर्थसं-२१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८/०४/२०१७
३) शासन निर्णय क्रमांक.मबाआ-२०१७/प्र.क्र.८०/का-७, दिनांक २०/०४/२०१७
४) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०/०६/२०१७
५) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६/०२/२०१८

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ या वर्षात महिला व बाल विकास विभागांतर्गत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचारीवृंदांचे वेतन बाबींकरीता मंजूर निधीपैकी उर्वरीत निधी वितरीत करावयाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या संदर्भ ०२ च्या परिपत्रकान्वये ८० टक्के निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार उपलब्ध शासन निर्णय दिनांक २०/०४/२०१७ अन्वये या निधी पैकी रुपये १९६७४९.६० इतका वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, वित्त विभागाच्या दिनांक ३०/०६/२०१७ च्या परिपत्रकान्वये पूर्वी मंजूरी केलेल्या ८० टक्के ऐवजी ७० टक्के निधी वितरीत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहे. तद्नंतर उपरोक्त बाचा क्र.०५ अन्वये वेतन यासाठीच्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत तरतूदीचा उर्वरित संपूर्ण निधी म्हणजेच १०० टक्के तरतूद उपलब्ध राहील. तरी यानुसार उर्वरित निधी खालीलप्रमाणे अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BEAMS) वर वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

(रु. हजारात)

मागणी क्रमांक -एक्स-१ २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण,	अर्थसंकल्पित निधी	आता पर्यत वितरित केलेला निधी	उर्वरित वितरित करावयाचा निधी
महिला व बाल कल्याण संचालनाय २२३५-२०७२,०१-वेतन	२४५९३७.००	१९६७४९.६०	४९१८७.४०

०२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सूपुर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप वाटप करण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

०३. सदरचा खर्चास वित्त विभागाच्या दिनांक १८/०४/२०१७ व दिनांक ३०/०६/२०१७ च्या परिपत्रका सोबतच्या परिशिष्टात नमूद बाबी व परिपत्रकातील परिच्देद क्र. ७ ते १८ मधील या आदेशास लागु होणाऱ्या अटींची पुर्तता होत असल्याने, विभागाच्या स्तरावरुन निधी कोषागारातून आहरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०४. सदरचा निधी खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्प करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतूदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०२१४१८०२१८६३३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.02.17 16:54:27 +05'30'

(ला. रा. गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई
३. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव
४. मा. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय
५. मा. अपर मुख्य सचिव (नियोजन) वित्त विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (आयुक्तालय, पुणे मार्फत)
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई (आयुक्तालय, पुणे मार्फत)
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत)
९. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय, पुणे मार्फत)
१०. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महाराष्ट्र (आयुक्तालय, पुणे मार्फत)
११. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (का.४), महिला व बाल विकास विभाग, मुंबई
१३. निवडनस्ती-का.७